## श्री. राम नाईक
## राज्यपाल, उत्तर प्रदेश



**संक्षिप्त परिचय**
**( 1 जानेवारी 2015 )**

1. आदरणीय राष्ट्रपती यांनी 14 जुलै 2014 रोजी श्री. राम नाईक यांना उत्तर प्रदेशचे राज्यपाल मनोनित केल्यानंतर श्री. नाईक यांनी 22 जुलै 2014 रोजी लखनौ येथे पद ग्रहण केले. त्यानंतर 5 ऑगस्ट 2014 रोजी त्यांच्याकडे राज्यपाल, राजस्थान म्हणून अतिरिक्त भार सोपविला गेला. 8 ऑगस्ट ते 3 सप्टेंबर 2014 पर्यंत राजस्थानच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त भार श्री. नाईक यांनी सांभाळला. कांची कामकोटी पीठ्मचे जगद्गुरु शंकराचार्य पुज्यश्री जयेंद्र सरस्वती स्वामीगल यांच्याहस्ते 13 डिसेंबर 2014 रोजी श्री. राम नाईक यांना 'राष्ट्रीय श्रेष्ठता सन्मान' बहाल करण्यात आला. यापूर्वी हा सन्मान मिळालेल्यांमध्ये भारतरत्न व माजी पंतप्रधान श्री. अटल बिहारी वाजपेयी, माजी राष्ट्रपती डॉ. शंकर दयाल शर्मा, भारतरत्न व माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम, आदी मान्यवरांचा समावेश आहे.

2. श्री.अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात श्री.राम नाईक हे 13 ऑक्टोबर 1999 ते 13 मे 2004 या कालावधीत पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री म्हणून कॅबिनेट मंत्री होते. 1963 मध्ये पेट्रोलियम व नैसर्गिक वायू खात्यासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन झाले. तेव्हांपासून ते आजपर्यंत पाच वर्षे पेट्रोलियम मंत्री राहिलेले ते एकमेव पेट्रोलियम मंत्री आहेत. त्यापूर्वीच्या केंद्र सरकारमध्ये रेल्वे (स्वतंत्र प्रभार), गृह, नियोजन व कार्यक्रम अंमलबजावणी आणि संसदीय कामकाज या खात्यांचे राज्यमंत्रीपद (13 मार्च 1998 ते 13 ऑक्टोबर 1999) श्री.नाईक यांनी भूषविले. एकावेळी इतकी महत्वाची खाती सांभाळणे विशेष मानले जाते. श्री. नाईक भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य होते. ज्या राज्यात भापजाची सरकारे आहेत त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी तसेच गुणसंवर्धनासाठी स्थापन केलेल्या 'सुशासन प्रकोष्ठ ' चे ते राष्ट्रीय संयोजक होते. 2014 मध्ये येणारी लोकसभा निवडणूक न लढण्याचा तसेच पक्षासाठी यापुढेही काम करीत राहून पक्षाला आपल्या अनुभवनाचा लाभ देण्याचा निर्णय भाजपाच्या आचार-विचारांचे प्रेरणास्त्रोत आणि एकात्म मानववादाचे जनक पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीदिनी श्री. नाईक यांनी 25 सप्टेंबर 2013 रोजी जाहीर केला. 2014 च्या लोकसभा निवडणुकीत त्यांच्या उत्तर मुंबई मतदार संघातील भाजपा उमेदवार श्री. गोपाळ शेट्टी हे महाराष्ट्रात सर्वात जास्त 6,64, 004 मते मिळवून सर्वाधिक मताधिक्यानी 4,46,582 विजयी झाले. श्री. नाईक श्री. शेट्टी यांचे निवडणूक प्रमुख होते.

3. श्री.नाईक यांनी पेट्रोलियम व नैसर्गिक वायू खात्याचे मंत्री म्हणून ऑक्टोबर 1999 मध्ये पदभार स्वीकारला. त्यावेळी देशातील एक कोटी दहा लाख ग्राहक घरगुती गॅससाठी प्रतिक्षा यादीवर होते. या सर्वांसह एकूण 3 कोटी 50 लाख नव्या गॅस जोडण्या देऊन श्री.नाईक यांनी प्रतिक्षा यादी संपविली. याउलट त्याआधीच्या 40 वर्षात एकूण 3.37 कोटी गॅस जोडण्या दिल्या गेल्या होत्या. याखेरीज शहरी भागातील कमी उत्पन्न गटातील लोकांसाठी आणि डोंगरी भागासाठी श्री.नाईक यांनी 5 किलोचा सिलेंडरही उपयोगात आणला. मागेल त्याला गॅसची नवी जोडणी मिळू लागली. त्याचप्रमाणे कच्च्या तेलाचे परावलंबित्व दूर व्हावे म्हणून त्यांनी विविध योजना आखून त्यांची अंमलबजावणी सुरु केली. त्यातील महत्वाचा एक निर्णय म्हणजे ऊसाच्या मळीपासून इथेनॉल निर्माण

करुन त्याचे पेट्रोलमध्ये 10 टक्के मिश्रण करणे. कारगिल लढाईतील हुतात्म्यांच्या वीरपत्नींना/जवळच्या नातलगांना तेल कंपन्यांच्या मार्फत पेट्रोल पंप आणि गॅस वितरण एजन्सी देण्याची अभिनव योजना त्यांनीच मंजूर केली. संसदेवरील हल्ल्याच्यावेळी आपल्या प्राणांची आहुती देणा-या सुरक्षा कर्मचा-यांच्या कुटुंबियांनाही पेट्रोलपंप दिले गेले. वाहनापासून होणारे प्रदूषण कमी व्हावे म्हणून दिल्ली आणि मुंबईमध्ये सीएनजी गॅस पुरविण्यास सुरवात केली. सध्या मुंबईत 1.40 लाख ऑटोरिक्षा, 53 हजार टॅक्सी, 7,500 खासगी मोटारी आणि 8,400 बसेस-ट्रक-टेम्पो सीएनजीवर चालतात. याशिवाय स्वयंपाकासाठी एलपीजी सिलेंडरऐवजी अधिक सुरक्षित, वापरण्यास सोपा आणि तुलनेने स्वस्त असा पाइप गॅस सुरु केला त्याचा लाभ मुंबईतील 7 लाख कुटुंबाना आणि 1,900 लघु-उद्योगांना होत आहे.

4. 'रेल्वे प्रवाशांचे मित्र' म्हणूनच राम नाईक यांना मुंबईकर ओळखतात. 1964 मध्ये गोरेगाव रेल्वे प्रवासी संघाची स्थापना करुन श्री.नाईक यांनी रेल्वे समस्या सोडविण्यास सुरुवात केली. ते रेल्वे राज्यमंत्री असतानाच 'मुंबई रेल्वे विकास महामंडळ' स्थापन झाले. विविध प्रकल्प सुरु झाले. 76 लाख मुंबई उपनगरी प्रवाशांच्या दृष्टीने उपनगरी रेल्वेच्या कार्यक्षेत्राचा डहाणूपर्यंत विस्तार, 12 डब्यांच्या गाड्या, संगणीकृत आरक्षण केंद्र, बोरीवली-विरार चौपदरी तर कुर्ला-कल्याण-सहापदरी रेल्वे मार्ग, अशा अनेक सुधारणांना सुरुवात झाली. रेल्वे फलाट आणि प्रवासी गाड्यामध्ये विडी - सिगरेट विक्रीस बंदी घालण्याचा ऐतिहासिक निर्णय श्री. नाईक यांच्याच कारकिर्दीत झाला. प्रवाशांकडून नावे मागवून नव्या गाड्यांचे नामकरण करण्यास त्यांनीच सुरुवात केली. जगातली पहिली 'महिला विशेष गाडी' सुरु करण्यात श्री.नाईक यांचा सिंहाचा वाटा आहे. 11 जुलै 2006 च्या उपनगरी गाड्यात झालेल्या बॉम्बस्फोटामुळे प्रभावित झालेल्या कुटुंबियांना मदत मिळवून देण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. 16 एप्रिल 2013 पासून डहाणू-चर्चगेट लोकल सुरु झाली त्यामागे श्री.राम नाईक यांचे दीर्घकाळाचे प्रयत्नच कारणीभूत आहेत. या निर्णयामुळे पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय सेवेचे 60 किलोमीटरचे क्षेत्र 124 किलोमीटर झाले.

5. उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातून सलग पाच वेळा निवडून येण्याचा विक्रम श्री.राम नाईक यांनी नोंदविल आहे. तत्पूर्वी, याच लोकसभा क्षेत्रातील बोरीवली विधानसभा मतदार संघातून सलग तीन वेळा ते विजयी झाले होते. 1999 मधील लोकसभेच्या निवडणुकीत 5,17,941 मते मिळविणारे श्री.नाईक महाराष्ट्रात सर्वाधिक मते मिळण्याच्या गौरवाचे मानकरी ठरले. मुंबईतून सलग आठवेळा निवडून येण्याचा विक्रम करणारे ते पहिले लोकप्रतिनिधी ठरले. जनप्रतिनिधी असताना उत्तरदायित्त्वाच्या तत्वाला अनुसरुन ते मतदारांना दरवर्षी कामाचा अहवाल सादर करीत असत. राज्यपाल झाल्यानंतरही श्री. नाईक यांनी ही परंपरा सुरु ठेवली. पहिल्या तीन महिन्यांच्या कारकिर्दीचे कार्यवृत्त ‘राजभवन में राम नाईक’ 20 ऑक्टोबर 2014 रोजी त्यांनी प्रकाशित केले.

6. लोकसभेत प्रवेश केल्यानंतर अल्पावधीतच मुरब्बी संसदपटू अशी प्रतिमा निर्माण झालेल्या श्री.नाईक यांनी 1995-96 मध्ये अत्यंत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणा-या लोकलेखा समितीचे अध्यक्षपद भूषविले. त्या पूर्वीच्या तीन लोकसभांमध्ये ते भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रतोद होते. नानाविध संसदीय आयुधांचा कौशल्याने वापर करण्याच्या गुणामुळे संसदेतील चर्चेत छाप पाडणा-या श्री.नाईक यांनी रोखे घोटाळ्यावरील संयुक्त संसदीय समिती, महिला अधिकारप्रदान समिती, रेल्वे कन्व्हेंशन समिती अशा अनेक महत्वाच्या समित्यांच्या कामात योगदान दिले आहे. लोकसभा अध्यक्षांच्या अनुपस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठीच्या पीठासिन अधिका-यांच्या तालिकेतही त्यांचा समावेश होता.

7. संसदेत 'वंदे मातरम्' गाण्याची प्रथा श्री राम नाईक यांच्या आग्रहामुळेच सुरु झाली. इंग्रजांच्या काळात झालेले 'बॉम्बे' व हिंदीतील 'बंबई' चे पुन्हा मूळ मराठी स्वरुपात 'मुंबई' करण्यासाठी त्यांनी सरकारला भाग पाडले. मतदार संघाच्या विकास कार्यासाठी प्रत्येक खासदारास दरवर्षी एक कोटी रुपयांचा निधी मिळण्याची मूळ कल्पना श्री राम नाईक यांचीच आहे. ते नियोजन आणि कार्यक्रम अंमलबजावणी खात्याचे राज्यमंत्री असतांना ही रक्कम दोन कोटी रुपये करण्याचा निर्णयही नियोजन व कार्यक्रम अंमलबजावणी राज्य मंत्री या नात्याने श्री. नाईक यांनी केला. आता ही रक्कम पाच कोटी रुपये झाली आहे. शिशु-आहाराच्या जाहिरातींवर बंदी आणून स्तनपानास प्रोत्साहन देण्यासाठी विरोधी पक्षात असताना त्यांनी संसदेत अशासकीय विधेयक मांडले. सरकारने त्याचा स्वीकार करुन नंतर त्याचे कायद्यात रुपांतर झाले.

8. श्री राम नाईक यांचा जन्म सांगली येथे 16 एप्रिल 1934 रोजी झाला. शालेय शिक्षण सांगली जिल्हयात पूर्वीच्या औंध संस्थानांत आटपाडी येथे झाले, तर त्यांनी बी.कॉम्.ची पदवी पुणे येथील बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयातून 1954 साली संपादन करुन एल्एल्.बी.ची पदवी मुंबईतील किशनचंद चेलाराम महाविद्यालयातून 1958 साली प्राप्त केली. श्री नाईक यांनी मुंबईतील अकाऊंटन्ट जनरलच्या कार्यालयातील लिपिक पदापासून नोकरीच्या पर्वाची सुरुवात केली. अल्पावधीत खाजगी क्षेत्रातील ख्यातनाम उद्योगात कंपनी सेक्रेटरी म्हणून ते स्थिरावले. काही काळ व्यवस्थापन सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहीले. श्री. नाईक बालपणापासूनच राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे स्वंयसेवक आहेत.

9. 1969 मध्ये मुंबईत जनसंघाचे पूर्णवेळ संघटन सचिव म्हणून काम करण्यासाठी श्री राम नाईक यांनी उत्तम नोकरीवर पाणी सोडले. 1977 पर्यंत त्यांनी त्या पदावर यशस्वीपणे काम केले. भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेनंतर पक्षाच्या मुंबई विभागाचे अध्यक्षपद श्री नाईक यांनी तीन वेळा भूषविले. ते भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे विशेष निमंत्रित सदस्य तसेच भाजपा ‘सुशासन प्रकोष्ठ’ चे राष्ट्रीय संयोजक होते.

10. तारापूर येथील अणु ऊर्जा प्रकल्प टप्पा 3 व 4 मुळे अक्करपट्टी व पोफरण येथील विस्थापितांच्या पुनर्वसनाचा लढा मुंबई उच्च न्यायालयात 2004 पासून स्वतः श्री.राम नाईक लढवित आहेत. विस्थापितांना न्याय मिळतो आहे. या संदर्भात 'गाथा संघर्षाची' हे पुस्तकही श्री.नाईक यांनी लिहिले आहे, त्याचा इंग्रजीतही अनुवाद झाला आहे. कुष्ठपीडित रुग्णांना सामाजिक प्रतिष्ठा लाभावी तसेच त्यांचे योग्य पुनर्वसन व्हावे म्हणून 5 डिसेंबर 2007 रोजी त्यांच्या पुढाकाराने राज्यसभेला विनंती अर्ज सादर केला. राज्यसभेच्या विनंती अर्ज समितीने देशभरात दौरे करुन आपला अहवाल 24 ऑक्टोबर 2008 रोजी सादर केला आहे. याशिवाय 1987 मध्ये प्रख्यात समाजशास्त्रज्ञ कै.डॉ.शरदचंद्र गोखले यांनी स्थापन केलेल्या आंतरराष्ट्रीय कुष्ठनिवारण संस्था, पुणे या संघटनेचे ते अध्यक्षही होते.

11. श्री राम नाईक यांना 1994 मध्ये कर्करोग झाला. परंतु श्री नाईक यांनी त्यावरही निग्रहाने मात केली. त्यानंतर गेली 20 वर्षे ते पूर्वीच्याच उत्साहाने व क्षमतेने काम करीत आहेत. जागरुकपणा, बारीकसारीक तपशीलाची नोंद घेणारी तीक्ष्ण नजर ही बलस्थाने आणि पारदर्शी प्रामाणिकपणा, कार्यकर्त्यांचे जाळे, लोकसंग्रह तसेच उल्लेखनीय कार्यक्षमता या गुणांमुळे श्री राम नाईक यांचे आगळेवेगळे व्यक्तिमत्व सर्वत्र आदरणीय ठरले आहे.

12. आदरणीय राष्ट्रपती यांनी उत्तर प्रदेशचे राज्यपाल म्हणून केलेल्या नियुक्तीच्या घोषणेनंतर 15 जुलै 2014 रोजी श्री. राम नाईक यांनी भारतीय जनता पार्टीच्या प्राथमिक सदस्यता तसेच सर्व पदांचा राजीनाम दिला आहे.

--------